**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २४०** **दिनांक :- ०२/०९/२०२१**

## मोक्कामधील आरोपीतांना अटक करुन वालीव पोलीस स्टेशनमध्ये २७ लाखाची दाखल घरफोडीसह कर्नाटक राज्याचे ५ चैनस्नॅचिंगचे गुन्हे उघड करण्यास यश.

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. २४/७/२०२१ रोजी १६.०० ते दि. २५/७/२०२१ रोजी सकाळी ०८.०० वाजताचे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने जिनय इंटरप्राईजेस कंपनीचे लॉक तोडुन सदर कंपनीमधील सुमारे २७ लाख रुपये किंमतीचा (सि.एन.सी मशिन मधील टुल्स) माल घरफोडी करुन चोरी केलेबाबत वालीव पोस्टे ७२९/२०२१ भादंविस कलम ४५४ ४५७ ३८० ३४ अन्वये गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने वरीष्ठांचे मार्गदर्शनाने तपास करीत असतांना गुप्त बातमीदारमार्फत माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा १) जमील अब्दुल बारी सिध्दीकी रा. संतोषभुवन नालासोपारा पुर्व याने त्याचे इतर साथीदारांचे मदतीने केला आहे. बातमीच्या अनुषंगाने जमील सिध्दीकी यास भाईंदर येथुन ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्याने गुन्हयाची कबुली देऊन सदर घरफोडी त्याचे साथीदार नामे. २) यासीन मकबुल खान वय ३९ रा. नागिनदासपाडा नालासोपारा पुर्व ३) राजकुमार रामकुमार पांचाळ ऊर्फ काण्या ऊर्फ व्हिडीओ वय ४०रा. भालगाव कल्याण पुर्व व रेकॉर्डवरील आरोपीत नामे ४) अरुण रामप्रताप सिंग वय ३७ रा. न्युलिंक रोड नालासोपारा पुर्व यांनी केला असल्याचे सांगीतले. गुन्हयाचे तपासात सर्व आरोपीतांना दिनांक २८/०८/२०२१ रोजी अटक करुन गुन्हयातील २७ लाख रुपये किंमतीचा १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने वालीव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटिकरण कक्षाने कौशल्यपुर्वक तपास करुन आरोपीत नामे. १) जमील अब्दुल बारी सिध्दीकी रा. उत्तरप्रदेश याने चालु वर्षात कर्नाटक राज्यामध्ये ५ चैन स्नॅचिंग गुन्हे केल्याचे कबुली दिली असता त्याअनुषंगाने कर्नाटक पोलीसांशी संपर्क केला असता आरोपी जमील सिध्दीकी हा चैन स्नॅचिंग मध्ये निष्पन्न झाल्याने आरोपीताकडुन कर्नाटक येथील चैन स्नॅचिंग मधील ८० ग्रॅम वजनाचे सुमारे ३,६८,०००/-रुपये किंमतीचे सोने हस्तगत करण्यात आले आहे.

आरोपीत १) जमील अब्दुल बारी सिध्दीकी २) यासीन मकबुल खान ३) राजकुमार रामकुमार पांचाळ यांनी एल.टी.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथील एका बिल्डीगमध्ये घरफोडी चोरी केल्याची कबुली दिली आहे. आरोपी नामे जमील अब्दूल सिध्दीकी व यासीन मकबूल खान हे माणिकपूर पोलीस स्टेशन कडील गुरनं. १५० /२०१७ मधील दाखल महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रधिबंध कायदयातील गुन्हयामध्ये सध्या जामीनावर असून त्यांचेवर ठाणे ग्रामीण, मुंबई, पालघर, मि.भा.-व.वि. पोलीस आयुक्तालयात ५० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्र. | उघडकिस आलेले गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|
| १ | वालीव पोस्टे I ७२९/२०२० भादविस कलम ४५४, ४५७, ३८० |
| २ | एल.टी.मार्गे पोलीस ठाणे, मुंबई I २८४/२०२० भादविस कलम ४५४, ४५७, ३८० (मुंबई) |
| ३ | संजयनगर पोलीस ठाणे I १५८/२०२१ भादविस कलम ३९२, ३४ (कर्नाटक राज्य) |
| ४ | संजयनगर पोलीस ठाणे I १५९/२०२१ भादविस कलम ३९२, ३४ (कर्नाटक राज्य) |
| ५ | अमृथाहल्ली पोलीस ठाणे I ३९२/२०२१ भादविस कलम ३९२, ३४ (कर्नाटक राज्य) |
| ६ | आर.टी.नगर पोलीस ठाणे I १६८/२०२१ भादविस कलम ३९२, ३४ (कर्नाटक राज्य) |
| ७ | मायक्रो ले आऊट पोलीस ठाणे I १६०/२०२१ भादविस कलम ३९२, ३४ (कर्नाटक राज्य) |

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, तुळीज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वपोनि. श्री. कैलास बर्वे, पोनि. श्री. राहुलकुमार पाटील, (गुन्हे), सपोनि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मनोज मोरे, मुकेश पवार, योगेश देशमुख, पो.ना. सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, अनिल सोनवणे, सतिष गांगुर्डे, पोअंम. विनेश कोकणी, बालाजी गायकवाड, गजानन गरीबे, सचिन बलीद यांनी केलेली आहे.

-----oooo-----